# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने नवीन वाहने खरेदीस मान्यता दिल्याबाबत

**(१) ४६२४ (०८-०९-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊनमुळे शासनावर आर्थिक संकट असल्याने शासकीय कर्मचाऱ्यांचे ५० टक्के वेतन देणे, महागाई भत्ता वाढ व सातवा वेतन आयोगाप्रमाणे देय असलेला दुसरा हप्ता देणे तसेच अन्य तातडीच्या कामांना स्थगिती देणे असे शासनाने निर्णय घेतलेले असताना दुसरीकडे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने क्रिस्टा २.४ २x मॉडेलच्या सहा नवीन वाहनांच्या खरेदीस मान्यता देण्याबाबत शासन निर्णय, क्रमांक वाहन-२०१९/प्र.क्र.१९/नोंदणी शाखा, दिनांक ३ जुलै, २०२० रोजी निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनावर आर्थिक संकट असल्याने शासकीय कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन देण्यासाठी कर्ज काढावे लागेल असे मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांनी एका पत्रकार परिषदेत माहे जुलै, २०२० च्या पहिल्या आठवड्यात जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक ३ जुलै, २०२० रोजी सहा नवीन वाहने खरेदीस मान्यता देणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागास वाहन आढाव्यानुसार ६ वाहने अनुज्ञेय असून, मा.मंत्री, शालेय शिक्षण यांच्यासाठी इनोव्हा क्रिस्टा २.४ २x हे एक वाहन खरेदी करण्यास शासन निर्णय क्रमांक : वाहन-२०१९/ प्र.क्र.१९/ नोंदणी शाखा, दिनांक ३ जुलै, २०२० अन्वये मान्यता दिली आहे.
(२) पुणे येथे सारथी संस्थेच्या कामकाजासंदर्भात बोलताना मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांनी करोना महामारीमुळे शासनाच्या महसुलात मोठ्या प्रमाणात घट झाली असूल, पुढच्या महिन्यात महाराष्ट्र सरकारला पगार देण्यासाठीसुध्दा कर्ज काढण्याची आवश्यकता पडेल अशी परिस्थिती आहे, असे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले होते.
(३) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांना वाहन आढाव्यानुसार वाहन अनुज्ञेय असून त्यांचेसाठी वाहन उपलब्ध नसल्याने, १ वाहन खरेदी करण्यास शासन निर्णय क्रमांक : वाहन-२०१९/प्र.क्र.१९/नोंदणी शाखा, दिनांक ३ जुलै, २०२० अन्वये मान्यता दिली आहे.

---

## राज्यातील शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी देण्याबाबत

**(२) ८६०४ (२०-०७-२०२१) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकांना १२ वर्षाची वरिष्ठ वेतनश्रेणी आणि २४ वर्षाची निवडश्रेणी सरसकट देण्याबाबतची मागणी शिक्षक भारती आणि अन्य शिक्षक संघटनांकडून होत आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, काही जिल्हयात प्रशिक्षण न झाल्यामुळे तसेच वरिष्ठ वेतनश्रेणी प्रस्ताव स्वीकारले जात नसल्यामुळे अनेक शिक्षक वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी पासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक/ अध्यापक विद्यालयातील लागू करण्यात आलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणीच्या अनुषंगाने प्रशिक्षणाच्या स्वरुपात कालानुरुप व सुसंगत बदल शासन निर्णय दिनांक २०/०७/२०२१ नुसार करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर-नागपूर रस्त्यावरील ताडाळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील प्रदूषण रोखण्याबाबत

**(३) ८८२३ (१५-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर-नागपूर रस्त्यावरील ताडाळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील सेंट्रल इंडस्टीज या लोखंड उत्पादन करणाऱ्या कारखान्यापासून प्रदूषण निर्माण होवून परिसरातील नागरिकांना व शेतकऱ्यांच्या पिकांना धोका निर्माण झाल्याचे दिनांक ७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रदूषणाबाबत नागरिकांनी जिल्हाधिकारी व प्रदूषण अधिकारी यांना निवेदन देवूनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार ताडाळी परिसरातील प्रदूषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही

(३) मे. चमन मेटॅलिक्स लि., मे.गोपानी आयर्न ॲण्ड पॉवर लि., व मे.ग्रेस इंडस्ट्रीज लि., या कारखान्यांमुळे प्रदूषण होत असल्याबाबतच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वरील तिन्ही उद्योगांची पाहणी करून दोषी आढळल्यामुळे तिन्ही उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावली आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील कोविड रुग्णालयात कोरोना बाधितांसाठी लागणारे रेमडेसिवीर इंजेक्शन पुरविण्याबाबत

**(४) ८९३५ (१७-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील कोविड रुग्णालयात कोरोना बाधितांच्या उपचारासाठी लागणाऱ्या रेमडेसिवीर इंजेक्शनचा तुटवडा भासत असून नव्या आदेशानुसार रुग्णालयातून इंजेक्शन पुरवले जाणार असूनही प्रत्यक्षात इंजेक्शन उपलब्ध नसल्याने नातेवाईकांना खूप धावपळ करावी लागत असून ते ठाणे अथवा पुण्यातून इंजेक्शन आणत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईत रेमडेसिवीर इंजेक्शनचा पुरेसा पुरवठा न झाल्याने अनेक रुग्णांनी जीव गमावला असून काही रुग्णालयात कसलाही त्रास नसताना केवळ पॉझिटिव्ह अहवाल आला म्हणून दाखल झालेल्या रुग्णाला रेमडेसिविर इंजेक्शनची गरज असल्याचे सांगून आठ ते दहा इंजेक्शन मागवून घेतले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नवी मुंबई येथील काही रुग्णालयात जास्तीचे रेमडेसिविर इंजेक्शन मागवून घेणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन सदर कोविड रुग्णालयात कोरोना बाधितांसाठी लागणारे रेमडेसिविर इंजेक्शन पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२३-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मार्च, २०२१ मध्ये कोविड-१९ ची दुसरी लाट सुरु झाली तेव्हा राज्यभरात रेमडेसिवीर इंजेक्शनचा तुटवडा होता. ठाणे, पुण्यासह सर्व जिल्ह्यांमध्ये सक्रीय रुग्णांची संख्या विचारात घेऊन सदर औषधांचे वाटप जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणाखाली करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे. साठवणूक व काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांचे नियंत्रणाखाली जिल्ह्यातील रुग्णालयांना सक्रीय रुग्णांची संख्या विचारात घेऊन रेमडेसिवीर इंजेक्शनचे वितरण केले जात होते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोईसर (ता.जि.पालघर) येथील दगड क्रशरमुळे होणारे वायू प्रदूषण रोखण्याबाबत

**(५) ८९७१ (२०-०७-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) येथील १५ ठिकाणी दगड क्रशरचे काम सुरु असून क्रशर मालक नियमांचे पालन करित नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दगडाच्या पावडरने मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोईसर येथील वायू प्रदूषण रोखण्याकरीता कार्यवाही करुन प्रदूषण करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे माहे जानेवारी २०२१ च्या दरम्यान मौजे नागझरी, पो.निहे, ता.जि.पालघर येथील मे.मिलन रोड बिल्टेक एल.एल.पी. या स्टोन क्रशर उद्योगाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उद्योगाची पाहणी करून दोषी आढळल्यामुळे उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, इतर १४ स्टोन क्रशर उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून समजपत्र देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खारघर, तळोजा व नवी मुंबई (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील कारखान्यांमधून प्रदूषण होत असल्याबाबत

**(६) ८९७५ (१५-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खारघर, तळोजा व नवी मुंबई (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कारखान्यांमधून प्रदूषण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषणामुळे नागरिकांना श्वसनाच्या समस्या, डोळ्यांची जळजळ, त्वचारोग अशा अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत असून प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रशासनाकडून अशा विषारी वायु सोडणाऱ्या कारखान्यांवर पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रशासनाने तळोजा औद्योगिक वसाहतीतील चुकीच्या मार्गाने वायू प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करुन प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२)** : (१) हे खरे नाही.
(२) खारघर-तळोजा कॉलनी वेलफेअर असोसिएशन यांचेकडून दिनांक २८/०१/२०२१ रोजी खारघर, तळोजा व नवी मुंबई (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील हवा प्रदूषणाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून औदयोगिक वसाहतीतील उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेबाबत पाहणी करण्यात येते. पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या उद्योगांवर कारवाई करण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये माहे ऑक्टोबर २०२० मध्ये करण्यात आलेल्या पाहणीत दोषी आढळलेल्या एकूण ०३ उद्योगांना कारणे दाखवा नोटीसा, ०१ उद्योगास प्रस्तावित निर्देश व ०४ उद्योगांना बंदचे आदेश बजावण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे माहे मार्च, २०२१ मध्ये वायू प्रदूषण करणाऱ्या एक उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशी, नवी मुंबई येथील खाडीमधील जल प्रदूषण रोखण्याबाबत

**(७) ९०९७ (१५-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी, नवी मुंबई शहरातील नागरिक वायू प्रदूषणामुळे त्रस्त असून सध्या पाण्यातील प्रदूषणात वाढ झाल्याने खाडीतील जलप्रदूषणामुळे लाखो मासे मृत पडल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या जलप्रदूषणामुळे नवी मुंबई येथील खाडीतील मासेमारी धोक्यात आली असून नवी मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा भाग असल्याने खाडीतील प्रदूषण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक कंपन्या सध्या सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता मिश्रीत पाणी जल प्रदूषणाबरोबर नवी मुंबईतील खाडीमध्ये सोडत असल्याने वाढणाऱ्या प्लास्टिक प्रदूषणामुळे देखील मच्छिमारांवर नवे संकट निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रासायनिक कंपन्यांवर कारवाई करुन मच्छिमारांसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) वाशी खाडीत पाण्यातील प्रदूषणात वाढ झाल्याने खाडीतील जलप्रदूषणामुळे मासे मृत पडल्याची तक्रार दूरध्वनीद्वारे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १२/१०/२०२० रोजी वाशी खाडी परिसराची सविस्तर पाहणी केली असता खाडीमध्ये मासे मरतुक झाल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून औदयोगिक वसाहतीतील उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेबाबत पाहणी करण्यात येते. पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या उद्योगांवर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर विभागातील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयामध्ये कामे प्रलंबित असल्याबाबत

**(८) ९३२२ (२०-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक) कार्यालयात थकबाकी प्रकरणे प्रलंबित ठेवणे, सातव्या वेतन आयोगाचा थकबाकीचा पहिला हप्ता अदा करण्यास जाणीवपूर्वक विलंब करणे, वैद्‌यकीय प्रतिपूर्तीची देयके प्रलंबित ठेवणे इत्यादी अनेक प्रकारच्या कामकाजास विलंब करण्याच्या तक्रारींबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक २०/०३/२०२१, २१/०३/२०२१, ०७/०४/२०२१ व ०८/०४/२०२१ रोजी पत्र/निवेदने पाठवून वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक) कार्यालयातील कामकाजाचा आढावा घेवून दंडात्मक कारवाई करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षात संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे आवश्यक असणारा निधी एकूण वार्षिक

अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ५ ते १५ टक्केच्या मर्यादेत मासिक स्वरूपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात येत होता.सबब निधीअभावी देयके प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वायू प्रदूषण रोखण्याकरीता कार्यवाही करण्याबाबत

**(९) ९७८९ (२०-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वायू प्रदूषणाचा धोका दिवसेंदिवस वाढत असून माहे फेब्रुवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्याच्या सुमारास प्रसिध्द झालेल्या ग्रीन पीस साऊथ-ईस्ट आशियाच्या आकडेवारीनुसार सन २०२० मध्ये मुंबईत २५ हजार जणांचे वायू प्रदूषणामुळे मृत्यू झालेले असून मुंबईची स्थिती चिंताजनक असल्याचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वायू प्रदूषणाबाबत राज्य शासनाकडून आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार वायू प्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये प्रसिध्द झालेल्या ग्रीन पीस साऊथ-ईस्ट आशियाच्या अहवालात सदर बाब नमूद आहे, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता तपासली जाते. त्याकरीता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मुंबईत ११ ठिकाणी हवा तपासणी केंद्रे उभारलेली आहेत.

उपरोक्त अहवालानुसार हवेतील धुळीकणांचे प्रमाण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांच्या तुलनेत सर्वसाधारणपणे काही प्रमाणात अधिक असल्याचे निदर्शनास येते. सर्वसाधारणपणे हवेतील प्रदूषकांची पातळी पावसाळ्यात सर्वात कमी व हिवाळ्यात सर्वाधिक असते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई शहरासाठी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी तयार केलेल्या कृती आराखड्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता मिळाली असून सदर आराखड्याची अंमलबजावणी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत

**(१०) १०२३७ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना शासनाने २० टक्के वेतन मंजूर केले परंतु शालार्थ आयडी नसल्यामुळे वेतन नियमित होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालार्थ आयडी शिक्षकांना देण्यासाठी विविध संघटनेनी व शिक्षकांनी वारंवार निवेदने देऊन मागणी करूनही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालार्थ आयडी शिक्षकांना देऊन वेतन नियमित करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर शिक्षकांना माहे जून, २०२१ पर्यंतचे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात आली होती. तसेच आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावरून प्रलंबित शालार्थ आयडीबाबत आढावा घेण्यात आला.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून वितरित करण्यात आलेल्या एकूण ४२७ भूखंडावर लाभार्थ्यांनी किंवा भूखंडधारकांनी कोणतेही बांधकाम न करता कराराचा भंग केल्याबाबत

**(११) १०८५२ (२०-११-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून मागील २५ ते ३० वर्षात वितरित करण्यात आलेल्या मुंबईतील एकूण ४२७ भूखंडावर लाभार्थ्यांनी किंवा भूखंडधारकांनी कोणतेही बांधकाम न करता कराराचा भंग केल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वितरित करण्यात आलेल्या भूखंडापैकी सर्वाधिक ३५० हून अधिक भूखंड हे बोरिवली (मुंबई) विभागातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कराराप्रमाणे निश्चित कालावधीत भूखंडाचा विकास करत तो वापरात आणणे बंधनकारक आहे या नियमाचे उल्लंघन केल्यास भूखंडाचे वितरण रद्द करुन सदर भूखंड ताब्यात घेण्याचा अधिकार असतानासुद्‌धा अनेक वर्षे पडून असलेले हे भूखंड ताब्यात घेण्याचा निर्णय मंडळाने आजतागायत घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार संबंधित दोषी अधिकारी तथा कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२८-०१-२०२२) :** (१) ते (५) म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून राबविण्यात आलेल्या जागतिक बँक प्रकल्पांतर्गत सन १९९४ मध्ये अत्यल्प, अल्प व उच्च उत्पन्न गटासाठी कोड क्र.०५१, ०५२, ०५३, ०५४ व ०५५ मध्ये जाहिरातीव्दारे सोडत काढण्यात आली.

यातील कोड क्र.०५१ मालवणी, ०५२ चारकोप व ०५३ गोराई हे मुंबई मंडळाच्या बोरीवली (विभागासाठी) तर कोड क्र.०५४ मुलूंडसाठी व ०५५ माजीवडे ठाणे साठी काढण्यात आली होती. सदरहू सोडतीत बोरीवली विभागात ४०४ भूखंडांचे वितरण करण्यात आले.

तथापि, सन १९९५ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण निर्बंध तरतूदीनुसार सदरचे भूखंड उच्चतम भरती रेषेपासून (HTL) ५०० मी. अंतरावरील असल्याने तसेच ते कांदळवन बाधित (CRZ) असल्याने, या भूखंडाचा विकास करण्यास दिनांक ०९/०३/१९९५ रोजी " Status quo" दिलेला आहे.

सदरहू प्रकल्पातील ३७० सहकारी गृहनिर्माण संस्थासोबत म्हाडाने सन १९९५ ते सन २०१० यादरम्यान करारनामे केलेले आहेत. परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ०९/०३/१९९५ चे आदेश व सागरी किनारा नियमन क्षेत्राचे निर्बंध (CRZ) असल्यामुळे कराराचा भंग झाला असे म्हणता येणार नाही.

मात्र, म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६८११, दिनांक ०४/०१/२०१९ नुसार (CRZ) ने बाधित नसलेल्या ११७ भूखंडधारकांनी त्यांना वितरित केलेल्या भूखंडावर अद्यापपर्यंत कोणतेही बांधकाम न केल्यामुळे अशा भूखंडधारकांना म्हाडाच्या स्तरावर नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

---

## श्री शरद बेलवटे मुख्य लेखाधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या पदोन्नती व गैरकारभाराबाबत

**(१२) १०८९७ (०६-१२-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.शरद बेलवटे, मुख्य लेखाधिकारी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांची प्रथम नियुक्ती लिपिक पदावर महाराष्ट्र शासनाच्या विहित पध्दतीने झाली असून त्यांना लिपिक ते कर निरीक्षक, लेखाधिकारी, मुख्य लेखाधिकारी या सर्व पदोन्नती देताना विभागीय परीक्षा घेण्यात आल्या नाहीत तसेच त्यांना देण्यात आलेल्या सर्व पदोन्नतीस महाराष्ट्र शासनाची मंजुरीही घेण्यात आलेली नाही तसेच त्यांना पदोन्नती देताना विविध सेवा संवर्ग बदलही झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा भरती नियम सन २०१९ नुसार मुख्य लेखाधिकारी पद प्रतिनियुक्तीचे आहे काय, तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र शासनाकडे सन २०१० ते आजपर्यंत मुख्य लेखा अधिकारी पदावर प्रतिनियुक्ती वरील अधिकारी यांची मागणी केली आहे काय,

(३) असल्यास, मुख्य लेखाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याबाबतच्या दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजीच्या तक्रार अर्जावर काहीही कार्यवाही झालेली नसतानाही त्यांना सदर पदावर बेकायदा पदोन्नती दिल्याचे मा.मुख्य सचिव महोदयांनाच्या निदर्शनास आल्यानंतर या प्रकरणी कारवाईस विलंब करणाऱ्या तत्कालीन आयुक्त श्री डॉक्टर विजय राठोड व श्री दिलीप ढोले आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यावरही अद्याप काहीही कारवाई करण्यात आलेली नाही तसेच, मिरा भाईंदर महानगरपालिका लेखापरिक्षण अहवालानुसार लेखा नियम डावलून श्री.शरद बेलवटे यांनी सन २०१० ते आजपर्यंत ठेकेदारांचे देयके अदा केलेली असल्याने या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेवून सर्व संबंधितांवर कारवाई करण्याकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०१-२०२२) :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सेवा भरती नियम २०१४ व तद्नंतर २०१९ रोजी मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापुर्वी प्रारूप सेवाप्रवेश नियमांच्या आधारे भरती/पदोन्नतीची कार्यवाही झालेली आहे.

(२) व (३) सन २०१९ च्या सेवाप्रवेश नियमात मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतूद केलेली आहे.

श्री.शरद बेलवटे मुख्यलेखाधिकारी हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ मे, २०२१ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर दिनांक ०८/०६/२०२१ व दिनांक ३० जून, २०२१ च्या पत्रान्वये मुख्यलेखाधिकारी पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने वित्त विभागाकडे मागणी केली आहे.

श्री.बेलवटे यांनी नियमबाह्यरित्या ठेकेदाराची बिले अदा केली, अशी वस्तुस्थिती नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोठारी (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील वृध्द महिला व मुलीचा भूकबळीने मृत्यू झाल्याबाबत

**(१३) १०९५६ (२३-११-२०२१) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठारी (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील वृध्द झेलाबाई पोचू चौधरी आणि मुलगी माया मारोती पुलगमकर यांचा त्यांच्या राहत्या घरात भूकबळीने मृत्यू झाल्याची घटना दिनांक ११ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तरीय तपासणीचा अंतिम अहवाल येण्यापूर्वीच घाईघाईने बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक व तहसिलदार यांनी दोघींचा मृत्यू भूकबळीने झाला नसल्याची माहिती प्रसार माध्यमांमधून प्रसारित करण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल व पोलीस प्रशासन भूकबळी प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे या प्रकरणाची अन्य जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करावी, अधीक्षक व तहसिलदार यांना निलंबित करावे व दोषींवर

कठोर कारवाई करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ रोजी पत्राव्दारे शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) प्रश्नभाग २ व ३ च्या अनुषंगाने चौकशी केली असता कोणी दोषी आढळून आल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले नसल्याने कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील नाग नदी पुनरुज्जीवित व प्रदूषणमुक्त करण्याबाबत

**(१४) ११०६७ (१२-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरचे वैभव असलेली नाग नदी पुनरुज्जीवित करण्याच्या प्रकल्पाची मागील दशकापासून घोषणा सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २४ नोव्हेंबर, २००८ मध्ये व त्यानंतर फेब्रुवारी, २०१० मध्ये नाग नदी पुनरुज्जीवित व प्रदूषणमुक्त करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेत घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या प्रस्तवाला मंजूरी देऊन व निधीची तरतूद करुन नाग नदी पुनरुज्जीवित व प्रदूषणमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२०-१२-२०२१) :** (१) व (२) होय.
(३) राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, केंद्रीय जलशक्ती मंत्रालय यांनी राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत नाग नदी प्रदूषण प्रतिबंधच्या सुधारित रुपये २४१२.६४ कोटी रुपयांच्या प्रस्तावास दिनांक ११/११/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावासाठी केंद्र शासन:राज्य शासन:नागपूर महानगरपालिका यांचा हिस्सा अनुक्रमे ६०%:२५%:१५% असा ठरविण्यात आला आहे. सदर प्रस्तावासाठी राज्य शासनाच्या एकूण रुपये ६०३.१६ कोटी (२५%) हिश्श्यापैकी रुपये ४०३.९ कोटी रक्कम (२१.७७%) केंद्र शासन जायका या संस्थेकडून घेणाऱ्या कर्जाची परतफेड म्हणून राज्य शासनाकडून हमी देण्यात आलेली आहे. त्याव्यतिरिक्त, राज्य शासनाचा उर्वरित हिस्सा रुपये १९९.२६ कोटी इतका निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल अशी हमी केंद्र शासनास देण्यात आली आहे. दिनांक २७/०३/२०२१ रोजी Expenditure Finance Committee-GOI पुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. Expenditure Finance Committee यांनी प्रस्तावाला काही दुरूस्तीसह मंजूरी प्रदान केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद शाळांमधील विज्ञान केंद्रे सुस्थितीत ठेवण्याबाबत

**(१५) ११२२१ (२३-११-२०२१) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्व शिक्षा अभियानातून नागपूर जिल्ह्यातील शंभर शाळांमध्ये अत्याधुनिक विज्ञान केंद्रे तयार करण्यात आली असून प्रशासनाच्या नियोजनाअभावी तेथील सर्व उपकरणे वापराविना धूळखात पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २३ विज्ञान केंद्रासाठी वर्गखोली नसणे, पटसंख्येच्या आधारावर शाळांची परस्पर निवड केलेली असणे तसेच, काही शाळांनी थकीत वीज बिल न भरल्याने विजपुरवठा खंडित केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभाग व जिल्हा परिषद यांच्यात समन्वय नसल्यामुळे विज्ञान केंद्र सुस्थितीत नाही याबाबत लोकप्रतिनिधी यांनी लेखी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विज्ञान केंद्रे सुस्थितीत ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) निवेदन आढळून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात वनस्पती उदयान (बोटॅनिकल गार्डन) विकसित करण्याबाबत

**(१६) ११५२१ (०६-०१-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर मार्गावरील विसापूर येथे बंगळूरच्या (कर्नाटक) धर्तीवर वनस्पती उद्यान (बोटॅनिकल गार्डन) विकसित करण्यात येणार असून त्यासाठी महसूल व वन विभागाने ५ कोटी ४४ लाख रुपयांचा निधी मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला असल्याचे दिनांक ३० जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वनस्पती उद्यान विकसित करण्यासाठी शासनाने ५ कोटी ४४ लक्ष रुपये उपलब्ध करुन दिला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वनस्पती उदयान (बोटॅनिकल गार्डन) तात्काळ विकसित करण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२४-०१-२०२२) :** (१) व (२) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावरील विसापूर येथे बंगळूरच्या धर्तीवर बोटनिकल गार्डन निर्माण करणे (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१२३/फ-९, दिनांक ३०/०७/२०२१ अन्वये रुपये ५४४.०० लक्ष रक्कम वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. परंतु सदर रक्कम अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BDS) वर चुकीच्या उपशिर्षात दर्शविल्यामुळे सदर अनुदान मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांना वितरीत करणे शक्य झाले नाही. त्यामुळे मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांचेकडून सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

त्यानुसार त्यांनी दिनांक २२/०९/२०२१ च्या पत्रान्वये (२४०६-२२९५) या राज्य योजनेंतर्गत ५०-इतर खर्च या उपशिर्षात रुपये ७५०.०० लक्ष रक्कमेचा सुधारीत प्रस्ताव सादर केला.

सदर प्रस्तावामध्ये BDS वर चुकीच्या उपशिर्षात रुपये ५४४.०० लक्ष वितरित केल्यामुळे शासन निर्णय दिनांक ३०/०७/२०२१ रद्द करण्यात आला.

वित्त विभाग शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दिनांक १४/१०/२०२१ अन्वये मंजूर अर्थसंकल्पीत निधीच्या ६०% अनुदान उपलब्ध होईल असे निर्देश असल्यामुळे सदर योजनेकरीता ६० टक्केच्या मर्यादेत ५०-इतर खर्च या उपशिर्षांतर्गत रुपये ७५०.०० लक्षपैकी रुपये ४५०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत असून शासन निर्णय दिनांक १०/११/२०२१ अन्वये ५०-इतर खर्च या उपशिर्षात रुपये ४५०.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथील बोटनिकल गार्डनच्या सुरु असलेल्या विविध कामांबाबत मा.प्रधान सचिव (वने) यांनी दिनांक ३०/०७/२०२१ रोजी चंद्रपूर येथे आढावा बैठक घेतली. सदर बैठकीतील सुचनेनुसार प्रस्तुत गार्डन विकसित करण्याबाबतची कामे सुरळीत पार पाडण्यासाठी अनुभवी प्रशिक्षित व्यक्तींची आवश्यकता भासणार असून त्यासाठी संस्था गठीत करुन त्याची नोंदणी करणे आवश्यक आहे असे निर्देश प्राप्त झाल्याने सदर प्रकरणी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांनी संस्था गठीत करण्याच्या दृष्टीने संस्था नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेले संस्थेचे Bye Laws प्रस्तावित करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यात वॉटर ग्रीड सारखी योजना राबविण्याबाबत

**(१७) ११६९३ (०२-१२-२०२१) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील धरणातील जलसाठा दरवर्षी कमी प्रमाणात शिल्लक राहत असल्यामुळे शासनाला नाशिक व अहमदनगर येथील धरणांचा जलसाठा मराठवाड्यासाठी द्यावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१ मध्ये मराठवाड्यात सर्वाधिक पाऊस पडून धरणे पूर्णत: भरल्यामुळे विविध धरणातील पाण्याचा विसर्ग करावा लागला असल्याचे तसेच मराठवाड्याच्या विविध जलप्रकल्पातून आतापर्यंत ४७७७ टीएमसी पाणी बाभळी प्रकल्पातून तेलंगणा राज्याला सोडण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यात पर्जन्यमान कमी असल्यामुळे वॉटर ग्रीड सारख्या योजना कार्यान्वित करण्याबाबत जल तज्ञांचा व जलसंपदा विभागाचे अधिकारी यांचा विरोध असल्यामुळे सदर योजना राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२१ मधील जलमय परिस्थिती लक्षात घेता मराठवाड्यात वॉटर ग्रीड योजना राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, निर्णय घेतला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मराठवाड्यात वॉटर ग्रीड सारखी योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१४-०२-२०२२) :** (१) होय. अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांच्या दिनांक ०९/०९/२०१४ रोजीच्या आदेशानुसार ज्यावर्षी जायकवाडी धरणातील १५ ऑक्टोबरचा उपयुक्त पाणीसाठा ६५% पेक्षा कमी असेल, त्यावर्षी उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यातील धरणातून मराठवाड्यातील फक्त जायकवाडी धरणात पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) होय. अंशत: खरे आहे.

सन २०२१ मध्ये मराठवाडा विभागात सर्वदूर चांगल्याप्रकारे पर्जन्यमान व काही भागात अतिवृष्टी झाल्यामुळे जवळपास सर्व धरणातून पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. महाराष्ट्र व तेलंगणा राज्याच्या सिमेवर असलेल्या बाभळी उच्च पातळी बंधारा येथून ५४७ टि.एम.सी. पुराचे पाणी तेलंगणा राज्यात नैसर्गिकरित्या वाहून गेले आहे.

(३) हे खरे नाही.

मराठवाड्यात टप्प्याटप्प्याने वॉटर ग्रीड योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक २३/०६/२०२१ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ग्रीडच्या प्रस्तावास जल जीवन मिशनमधून घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) व (५) मा.मंत्रिमंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पैठण तालुक्यातील ग्रीडच्या कामासाठी दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरीवली, पूर्व येथील ‘शांतिवन’ आगाराचे नुतनीकरण करण्याबाबत

**(१८) ११७३५ (०५-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली, पूर्व येथे असलेल्या ‘शांतिवन’ या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात मूलभूत सोयी-सुविधा नसल्याने सद्य:स्थितीत प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शाासनाने चौकशी करुन सदरहू ठिकाणी सर्व सोयी-सुविधांनी युक्त अद्ययावत बसस्थानक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) नाही.

(२) नॅन्सी कॉलनी येथे रा.प. महामंडळाचे मूलभूत सोयी व सुविधा युक्त असे बसस्थानक कार्यरत आहे. सदर बसस्थानकाच्या जागी अद्यावत मूलभूत सोयी सुविधा युक्त नवे बसस्थानक बांधण्याचे महामंडळाचे प्रयोजन आहे. परंतु महामंडळाची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने सदर बाबतीत निर्णय घेण्यात आलेला नाही. दरम्यान विधान परिषद विरोधी पक्ष नेता यांनी त्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सदर ठिकाणी प्रवासी विश्रांतीगृह/ प्रवासी आसन गृह बनविणे व बसस्थानकाचे सुशोभिकरण करण्यासाठी उप अभियंता-५ (प.), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मुंबई (म्हाडा) यांच्याकडे प्रस्तावित केल्याने रा.प.मुंबई विभागाकडून उप अभियंता-५ (प.), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मुंबई (म्हाडा) यांना "ना-हरकत प्रमाणपत्र" कळविले आहे. कोव्हीड १९ मुळे अद्याप काम सुरु झालेले नाही, बांधकाम हाती घेण्यासाठी म्हाडाकडे महामंडळाच्या मुंबई विभागाकडून पाठपुरावा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी व्यवस्थापनाच्या शाळातील कर्मचाऱ्यांच्या कामाबाबत

**(१९) ४२५९० (०१-०८-२०१८) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांची सेवा विषयक माहिती व आर्थिक लाभ मिळण्याकरीता संस्थेकडे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी व्यवस्थापनामधील शिक्षक व मुख्याध्यापक यांना मिळणारी दर वर्षाची वरिष्ठ श्रेणी, वैद्यकीय प्रतिपूर्ती, वेतन प्रकरण, भविष्य निर्वाह निधी या संबंधात सर्वच बाबींबाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनेक अडचणी येत असून संस्था त्यांची आर्थिक फसवणूक करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विहित मुदतीत संस्थेकडून काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत महाराष्ट्र खाजगी शाळा अधिनियम, १९७७ नुसार शाळा न्यायाधिकरणांची स्थापना करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील ३६६ जुन्या इमारतींचा पुनर्विकास होण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये आवश्यक तरतूद करण्याबाबत

**(२०) ४९३४० (२३-०८-२०१९) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात सुमारे १४ हजार जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती असून त्यामधून सन १९७० च्यादरम्यान बांधलेल्या आणि धोकादायक इमारतींच्या यादीत समाविष्ट असलेल्या ३६६ इमारतींना वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या कायद्यात उपकरप्राप्त इमारतींच्या तसेच अन्य चाळींच्या पुनर्विकासाची तरतूद असली तरी या ३६६ इमारतींच्या पुनर्विकासाबाबत कोणतीही तरतूद नसल्याने सदर चाळींत वास्तव्य करणारी सुमारे ४० हजार कुटुंबे हवालदिल झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ३६६ जुन्या इमारतींचा तातडीने पुनर्विकास होण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये आवश्यक तरतूद करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०१-२०२२) :** (१) ते (४) मुंबई शहरात एकूण १९,६४२ एवढया मूळ उपकर प्राप्त इमारती होत्या. त्यापैकी पाच हजारांवर इमारतींची पुनर्बांधणी करण्यात आली असून आज सुमारे १४,२०७ एवढया जुन्या उपकर प्राप्त इमारती शिल्लक आहेत. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडा) ने पुनर्बांधणी केलेल्या ४५४ पुनर्रचित इमारतींचे बांधकाम १९७३-७४ ते २०१५-१६ या कालावधीत झाले असून त्यातील ६६ पुनर्रचित इमारती ह्या

पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत (PMGP) बांधल्या आहेत. शासनाने दिनांक ०८/०७/२०२१ रोजीचे अधिसूचनेन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३(७) मध्ये केलेल्या सुधारणेत म्हाडाने PMGP अंतर्गत बांधलेल्या तीस वर्षे जुन्या इमारतींचा पुनर्विकास विनियम ३३(७) अन्वये अनुज्ञेय करण्याबाबत सुधारणा करण्यात आली. म्हाडाने पुनर्रचित केलेल्या उर्वरीत ३८८ ईमारतींचे पुनर्विकासासंबंधी स्वतंत्र तरतूद नसली तरी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये जुन्या मोडकळीस आलेल्या तसेच धोकादायक घोषित इमारतीचा पुनर्विकासासंबंधी विविध तरतूदी असून अशा इमारतींचे पुनर्विकासाकरीता सदर तरतुदींचा पर्याय उपलब्ध आहे.

तरीही "म्हाडाने पुनर्रचित केलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबतची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये नव्याने तरतुद करुन पुनर्विकासाचे धोरण निश्चित करणे" या विषयी मा.मंत्री (नगरविकास) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५/११/२०२१ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस म्हाडाने पुनर्रचित केलेल्या व सद्य:स्थितीत बिगर उपकरप्राप्त असलेल्या इमारतींच्या विकासासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये नवीन विनियमाचा अंतर्भाव करण्याबाबत म्हाडाने नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत व त्यावर नगरविकास विभागाने निर्णय घेण्याबाबत मा.मंत्री, नगरविकास यांनी निदेश दिले आहेत. त्यानुसार उपाध्यक्ष, म्हाडा यांनी दिनांक ०३/१२/२०२१ चे पत्राद्वारे शासन नगरविकास विभागास प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.